जळगाव १८, (प्रतिनिधी) : नाविन्यपूर्ण संशोधनावर भर देतांना संशोधक विद्यार्थ्यांनी आवड, संयम, चिकाटी या वृत्तीतून गुणवत्तापूर्ण व आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळेल असे नवे संशोधन करावे असे आवाहन कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या रसायनशास्त्र प्रशाळेच्या वतीने दि. १८ व १९ सप्टेंबर रोजी "रसायनशास्त्र आणि तंत्रज्ञानातील नवीनतम विकासासाठी जागतिक संधी (GOLD CT)" या विषयावर दुसरी अंतरराष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली असून आयसीटी मुंबईचे माजी कुलगुरु प्रा.जी.डी.यादव यांच्या हस्ते ऑनलाईन पध्दतीने झाले. विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून संबोधित करतांना कुलगुरू प्रा. माहेश्वरी बोलत होते. यावेळी दक्षिण आफ्रिकेतील प्रा.श्रीकांता जोन्नलगड्डा यांची प्रमुख उपस्थिती होती. मंचावर प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, अधिष्ठाता प्राचार्य एस.एस. राजपूत, प्रशाळेचे संचालक प्रा.डी.एच.मोरे व निमंत्रक प्रा.डी.एस.दलाल, प्रा.पी.पी. माहुलीकर उपस्थित होते. प्रा. माहुलीकर हे महिनाअखेर सेवानिवृत्त होत असून त्यांच्या सेवेचा गौरव करण्यासाठी ही परिषद होत आहे.

प्रा.माहेश्वरी म्हणाले की, मानवी अन्न, मानवी आरोग्य आणि मानवी सोय या संशोधनातील श्रेण्या आहेत. प्रत्येक टप्प्यावर यामध्ये प्रगती होत गेली. शोधनिबंध लिहिण्यात भारत हा जगात पाचव्या क्रमांकावर असला तरी या शोध निबंधाच्या गुणवत्तेत १५३ व्या स्थानावर आहे. संशोधन उध्दरण (सायटेशन) फार कमी प्रमाणात होते. संशोधनात नाविन्य असणे गरजेचे आहे. त्यासाठी निरीक्षण शक्ती, विश्लेषण क्षमता असायला हवी. केलेले संशोधन आंतरराष्ट्रीय स्तरावर टिकायला हवे त्यासाठी पेटंट प्राप्त करणे गरजेचे आहे. चीन मध्ये ४० लाख पेटंट दरवर्षी फाईल होतात. भारतात हे प्रमाण ९० हजाराच्या आसपास आहे. त्यापैकी केवळ २० हजार उच्च शिक्षणक्षेत्रातील पेटंट फाईल होतात हे प्रमाण वाढायला हवे अशी अपेक्षा प्रा.माहेश्वरी यांनी व्यक्त केली.

ऑनलाईन उद्घाटन करतांना पद्मश्री प्रा.जी.डी. यादव यांनी परिषदेसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. प्रा. श्रीकांता जोन्नलगड्डा यांनी आपल्या भाषणात संशोधनाच्या समस्या आणि उपाय समजण्यासाठी अशा परिषदा उपयुक्त ठरतात. त्यासोबतच तरूण संशोधकांना दिशादर्शन होते नेटवर्क तयार होते, असे ते म्हणाले. प्रारंभी प्रा.डी.एच. मोरे यांनी प्रशाळेविषयी माहिती दिली. प्रास्ताविकात निमंत्रक प्रा.डी.एस. दलाल यांनी परिषदेत ६३२ जण सहभागी झाले असल्याची माहिती दिली. यामध्ये १८९ पदव्युत्तर विद्यार्थी, २३७ संशोधक विद्यार्थी, १९० अॅकेडमीशीयन, ०८ उद्योजक आदींचा समावेश आहे. परदेशातील ८ तज्ज्ञ देखील या परिषदेत सहभागी आहेत असे त्यांनी सांगितले. उद्घटनानंतर परिषदेचे समांतर सत्र पर्यावरणशास्त्र प्रशाळेचे सभागृह, दृकश्राव्य सभागृह आणि रसायनशास्त्र प्रशाळेचे सभागृह या चार ठिकाणी झाले. यामध्ये प्रा. प्रा.श्रीकांता जोन्नलगड्डा, दक्षिण कोरिया येथील प्रा. सोहन दाईओवन प्रा. बाबासाहेब संकपाळ, डॉ. शेषनाथ भोसले, डॉ. दिनेश सावंत, डॉ. पी.पी. वडगावकर, प्रा.व्ही.आर. पाटील, मेक्सिको येथील प्रा. मारीसेला मार्टिनेज, प्रा. के.के. शर्मा, प्रा.एन.एन. कराडे, डॉ. बुबून बॅनर्जी, डॉ. रोहन एरंडे, डॉ. अंकुश बिरादार आदींनी मार्गदर्शन केले.

या परिषदेचा समारोप उद्या गुरूवार दि. १९ सप्टेंबर रोजी दुपारी होणार असून प्रमुख पाहुणे म्हणून भारतीय विज्ञान शिक्षण आणि अणुसंधान संस्था (आयआयएसईआर) पुणे चे माजी वरीष्ठ प्रा. ए.ए. नातू हे उपस्थित राहणार आहेत. प्रा.पी.पी.माहुलीकर यांचा विशेष सत्कार उद्या होणार आहे.

..........................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: १८ सप्टेंबर, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी

जळगाव १८, (प्रतिनिधी) : उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन आणि कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दि. २० सप्टेंबर रोजी 'महिला सुरक्षितता व शिष्यवृत्ती' या विषयावर एक दिवसाची विभागस्तरीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

शुक्रवारी सकाळी १० वाजता अधिसभा सभागृहात होणाऱ्या या कार्यशाळेसाठी जिल्हाधिकारी आयुष प्रसाद प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी अध्यक्षस्थानी राहतील. पोलिस अधिक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे, व्य.प. सदस्य राजेंद्र नन्नवरे यांची देखील उपस्थिती राहणार असून ॲड सुशिल अत्रे व प्रा.डॉ.विजेता सिंग हे कार्यशाळेत मार्गदर्शन करणार आहेत. तीनही जिल्हयातील प्राचार्यांसाठी होणाऱ्या या कार्यशाळेत विशाखा मार्गदर्शक तत्वे, कामाच्या ठिकाणी महिला लैंगिक छळ प्रतिबंध कायदा-२०१३, विद्यापीठ अनुदान आयोग यांची २ मे २०१६ ची मार्गदर्शक तत्वे, अनुदान आयोगाने महिला सुरक्षे संदर्भात केलेल्या शिफारशी, महिला वसतिगृहांसाठी सुरक्षा व उपाययोजना तसेच शिष्यवृत्ती या विषयावर चर्चा होणार आहे. या कार्यशाळेस प्राचार्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन कुलसचिव डॉ. विनोद पाटील तसेच जळगाव विभागाचे सहसंचालक डॉ. रणजितसिंह निंबाळकर यांनी केले आहे.

.............................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: १८ सप्टेंबर, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी